इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद

मुंबई येथील उच्च न्यायालयात साधारण
मूळ दिवाणी अधिकार क्षेत्र

व्यावसायिक समरी दावा क्रमांक ९१/२०२२

मधील
अंतरिम अर्ज (एल) क्रमांक ११००६/२०२३

स्टेट बँक ऑफ इंडिया)... अर्जदार/मूळ प्रतिवादी

मधील प्रकरणात

बॉम्बे आयर्न अँड स्टील लेबर बोर्ड)... वादी

विरुद्ध

स्टेट बँक ऑफ इंडिया)... प्रतिवादी

वादी यांचे वकील श्री. शैलेश नायडू यांनी श्री. संजय शिंदे यांच्या सूचनांच्या आधारे युक्तिवाद केला सोबत, श्री प्रथमेश भारुवंशे.

प्रतिवादीचे वकील सुरेश शेट्ये सोबत रवी गोएंका, अभिजीत खैरवारे यांनी गोएंका लॉ असोसिएट्स यांच्या सूचनांच्या आधारे युक्तिवाद केला.

न्यायमंच : न्यायमूर्ती अभया आहुजा.

दिनांक : १० जुन २०२४

<u>तोंडी न्यायनिर्णय</u> :

1. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (सीपीसी) च्या आदेश ७ नियम ११ अन्वये प्रतिवादी-स्टेट बँक ऑफ इंडियाने (प्रतिवादी - बँक) हा अंतरिम अर्ज दाखल केला आहे, कायद्याने प्रतिबंधित असल्याच्या व व्यावसायिक न्यायालय अधिनियम २०१५ (व्यावसायिक न्यायालय कायदा) च्या अन्वये हा दावा चालवला जाऊ शकत नाही या कारणास्तव दावा फेटाळण्याची / दावा परत करण्याची मागणी केली आहे. त्यावर वादी - मंडळाने उत्तर दाखल केले आहे.

2. अर्जदाराचे अभ्यासू वकील श्री. शेट्ये सादर करतात की, वादीने प्रतिवादी - बँकेकडून ३६,००,००,०००/- रुपये रक्कमची व्याजासहित वसुली करण्यासाठी सध्याचा दावा दाखल केला आहे, हे पैसे वादीने प्रतिवादी - बँकेकडे मुदत बंद ठेवी स्वरूपात ठेवले होते. परंतु, दाव्यानुसार, वादिने १५ मे २०१९ रोजी सह पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून आरोप केले आहेत की, प्रतिवादी-बँकेचे व्यवस्थापक श्री. निखिल रॉय यांनी फसवणूक केली आहे, निधीचा अपहार केला आहे आणि त्यांच्या सक्रिय सहभागाने आणि संगनमताने वादींच्या संमतीशिवाय रु.३६,००,००,०००/- ची रक्कम काढल्याचा आरोप केला आहे, फसवणुकीचा आणि गैरव्यवहाराचा युक्तिवाद करताना, की, हा व्यवहार व्यावसायिक व्यवहार असू शकत नाही कारण दाव्याचा विषय फसवणुक आणि गैरव्यवहारा वर आधारीत आहे.

3. श्री. शेट्ये यांनी सादर केले की वादीने हा दावा व्यावसायिक समरी दावा म्हणून दाखल केला आहे जो प्रामुख्याने व्यावसायिक न्यायालय कायद्यातील तरतुदींद्वारे शासित आहे आणि कलम 2 (1) (सी) (i) ते (xxii) मध्ये नमूद केलेल्या विवादांना व्यावसायिक वाद मानले जाते आणि व्यावसायिक न्यायालय कायद्याच्या तरतुदींनुसार व्यावसायिक दावा म्हणून दावा चालविण्यास पात्र आहे, सध्याचा दावा विषय असलेला वाद हा व्यावसायिक न्यायालय कायद्या मधील आदेश आणि तरतुदींचा विचार करता व्यवसायिक वाद म्हणून विचारात घेतला जाऊ शकत नाही त्यामुळे हा वाद टिकण्या योग्य नाही.

4. श्री. शेट्ये सादर करतात की वादीने दाव्यात आरोप केला आहे की प्रतिवादी-बँकेत मुदत बंद ठेवींच्या स्वरूपात ठेवलेल्या निधीच्या बाबतीत फसवणूक आणि गैरव्यवहार झाला आहे, त्यामुळे दाव्यानुसार दावा दाखल करण्यास कारण हे फसवणूक हे आहे, जे व्यावसायिक व्यवहार म्हणून नाही तर कथितरित्या झाले आहे.

5. श्री.शेट्ये सादर करतात की कथित फसवणूक आणि दाव्यात नमूद केल्याप्रमाणे निधीचा अपहार हा व्यावसायिक न्यायालये कायद्याच्या कलम २ (१) (सी) (i) ते (xxii) नुसार व्यावसायिक वादांच्या व्याख्येत येत नाही आणि म्हणूनच, सध्याचा दावा आणि त्यातील दाव्याचे कारण व्यावसायिक वाद म्हणून ग्राह्य धरले जाण्यास पात्र नाही

आणि म्हणूनच हा दावा व्यावसायिक न्यायालय कायद्यांतर्गत व्यावसायिक दावा म्हणून पुढे जाऊ शकत नाही.

6. श्री. शेट्ये यांनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या आयएचएचआर हॉस्पिटॅलिटी (आंध्र) प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध सीमा स्वामी आणि इतर[1] या प्रकरणात निर्णयाचा आधार घेतला आहे आणि ते सादर करतात की या प्रकरणात असे स्पष्टपणे म्हटले गेले आहे की, जर व्यवहाराचे स्वरूप आणि वसुली ही लुबाडलेली रक्कम या निश्चित विधानाच्या आधारे मागितली गेली असेल तर त्याला व्यावसायिक व्यवहार म्हणता येणार नाही किंवा व्यवसायाच्या सामान्य प्रक्रियेत उद्भवला असे म्हणता येणार नाही आणि त्यामुळे दावा व्यावसायिक न्यायालय कायद्याच्या कलम २ (१) (सी) अन्वये परिभाषित केल्याप्रमाणे व्यावसायिक दावा म्हणून पात्र ठरत नाही. विद्वान वकील, युक्तिवाद करतात की, म्हणूनच, दावा फेटाळून लावण्यात यावा आणि परत केला जावा कारण तो व्यावसायिक समरी दावा म्हणून दाखल केला जाऊ शकत नाही.

7. दुसरीकडे, वादीचे विद्वान वकील श्री. नायडू यांनी श्री. शेट्ये यांच्या युक्तिवादाला विरोध केला. श्री नायडू यांनी सादर केले की वादी हे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ ("माथाडी कायदा") या विशेष कायद्याअंतर्गत स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य सरकारचे

[1] २०२२ एसएससी ऑनलाईन दिल्ली ३६३५

प्राधिकरण आहे, आणि काही विशिष्ट रोजगारांमध्ये कार्यरत असलेल्या माथाडी, हमाल इत्यादी असुरक्षित हातकामगारांच्या रोजगाराचे नियमन करण्यासाठी, त्यांच्या रोजगाराच्या अटी व शर्तींसाठी चांगली तरतूद करण्यासाठी, त्यांच्या कल्याणासाठी आणि आरोग्य आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांसाठी आणि असुरक्षित हातमजुरांच्या कल्याणासाठी काम करणारी एक वैधानिक संस्था आहे. ते, वादींचे मंडळ हे माथाडी कायदा आणि बॉम्बे लोह आणि पोलाद असुरक्षित कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना व्यवस्थापन 1970 ('सदर योजना') अंतर्गत अधिकार प्राप्त आहे आणि नोंदणीकृत नियोक्त्यांकडून मंडळाला प्राप्त शुल्क, वेतन आणि शुल्काच्या स्वरूपात प्राप्त होणाऱ्या पैशांमधून स्वतःच्या निधीचे करण्यासाठी कामगारांच्या संरक्षणासाठी सरकारने स्थापन केलेली आहे. ते, वादी - मंडळ हे सिक्युरिटीज आणि डिपॉझिट मधील गुंतवणुकीवर व्याजाच्या रूपात पैसे स्वीकारते. नायडू सादर करतात की राज्य सरकारने तयार केलेल्या या योजनेच्या कलम ६ (४) नुसार, वादी - मंडळाला आपला निधी केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा इतर कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये गुंतविण्याची परवानगी आहे.

8. त्या प्रतिवादी- बँकेने वादी यांस दिनांक 13 डिसेंबर 2018 च्या ईमेलद्वारे, मुदत ठेवींवरील सर्वोत्तम व्याज दरांबद्दल कळवले. आणि प्रतिवादी - बँकेने वरील ईमेलद्वारे सूचित केलेल्या व्याज दरांचा विचार केल्यानंतर, वादीने आपला निधी प्रतिवादी - बँकेतील मुदत ठेवींमध्ये गुंतविण्याचा निर्णय घेतला.

9. त्यानुसार, १५ डिसेंबर २०१८, रोजी वादीने प्रतिवादी बँकेला दिनांक १४ डिसेंबर २०१८ रोजी ची तीन अनिवार्य पत्रे दिली ज्यामध्ये सूचना करण्यात आली होती की, गुंतवणूक पत्रात नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार पैसे मुदत बंद ठेवीमध्ये गुंतवण्यात यावे. सदर पत्रात नमूद असलेल्या अनिवार्य अटी खाली पुन्हा नमूद करण्यात आल्या आहेत. :

(i) हे खाते या मंडळाचे अध्यक्ष व सचिव संयुक्तपणे चालवतील.

(ii) या ठेवीच्या आधारे कोणतेही कर्ज उभे करण्याचा किंवा कोणत्याही कर्जासाठी तारण म्हणून ही ठेव देण्याचा अधिकार कोणत्याही स्वतंत्र व्यक्तीला नाही.

(iii) मुदत बंद ठेव पावती गहाण ठेवली जाणार नाही, त्यावर उचल घेतली जाणार नाही, ते तारण म्हणून ठेवले जाणार नाही, हायपोथीकेटेड किंवा इतर कोणालाही हस्तांतरित केले जाणार नाही. या मुदत बंद ठेवीच्या रकमेवर किंवा या मुदत बंद ठेवीच्या पावतीवर कोणतेही कर्ज दिले जाणार नाही.

(iv) कृपया आम्हाला जारी करण्यात आलेल्या प्रमाणपत्रावर आणि आपल्या संगणक प्रणालीमध्ये नो लीन असे चिन्हांकित करा जेणेकरून ते

ठळकपणे प्रदर्शित होईल. मुदत बंद ठेव पावतीतील रक्कम मुदत संपेपर्यंत गोठवण्यात यावी .

(v) पावतीच्या दर्शनी भागावर ओरिजिनल असे चिन्हांकित करावे आणि सही करावी. तसेच दर तीन महिन्यांनी मंडळ पडताळणीसाठी आपल्या शाखेशी संपर्क साधेल, आपल्याला विनंती आहे की आपण सहकार्य करावे आणि पावती जारी करण्यासाठी योग्य ती पूर्तता करावी.

10. असे सादर केले जाते की, त्यानुसार, वादीने प्रतिवादी - बँकेत ठेवी ठेवण्यासाठी विविध रकमेचे धनादेश काढले. श्री नायडू यांनी सादर केले की,16 फेब्रुवारी 2019 रोजी पर्यंत एकूण रु.45,00,00,000/- च्या मुदत ठेवी वादीने प्रतिवादी-बँकेकडे ठेवल्या होत्या.

11. त्यानुसार, वादीच्या प्रतिनिधींनी प्रतिवादी - बँकेकडे ठेवलेल्या मुदत ठेवींची नियमितपणे पडताळणी केली. ११ एप्रिल २०१९ रोजी, प्रतिवादी - बँकेने आपल्या संगणक प्रणाली वरील रु.45,00,00,000/- च्या मुदत ठेवींची स्थिती बाकी म्हणून वादींच्या अधिकाऱ्यांना दाखवली. प्रतिवादीच्या व्यवस्थापकाने - बँकेने वादीला प्रमाणित केले की वादीने दिलेल्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे रु.45,00,00,000/- च्या मुदत ठेवी वादीने प्रतिवादी-बँकेकडे दोन वर्षांच्या कालावधीसाठी उघडल्या आहेत

आणि सदरची मुदत बंद ठेव पावती/खाती ही कोणत्याही कर्ज, गहाण आणि बोजापासून मुक्त आहेत.

12. मे २०१९ या महिन्यात, वादीने पुन्हा एकदा प्रतिवादी - बँकेकडे रु.45,00,00,000/- च्या मुदत ठेवींची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आणि वादीचे अध्यक्ष आणि सचिव इतर अधिकाऱ्यांसह प्रतिवादी - बँकेशी संबंधित मुदत ठेवींची पडताळणी आणि खात्री करण्यासाठी संपर्क साधला. असे सादर केले जाते की प्रतिवादी - बँकेचे व्यवस्थापक, वादीच्या अधिकाऱ्यांना पाहिल्यानंतर पळून गेले आणि शाखेत परत आले नाहीत. तो, संबंधित मॅनेजर सुमारे दोन वर्षांपासून फरार होता आणि सध्या तो तुरुंगात आहे. वादीने शाखेतील अधिकाऱ्यांकडे आपली तोंडी तक्रार नोंदवली आणि त्यानंतर वादीच्या मुदत ठेवींची पडताळणी आणि त्याची पुष्टी करण्याच्या उद्देशाने दोन अधिकाऱ्यांची नेमणूक करून प्रतिवादी बँकेकडे पाठविण्यात आले.

13. असे सादर केले जाते की, त्यानंतर, वादीने १३ मे २०१९ रोजी एक हस्तलिखित पत्र सादर केले आणि प्रतिवादी - बँकेकडून मागणीनुसार किंवा मर्यादा पूर्ण झाल्यानंतर बाकी आणि देय असलेल्या मुदत ठेवींबद्दल आणि संगणक प्रणालीवरील मुदत ठेवींच्या स्थितीबद्दल पुष्टी मागितली. असे सादर केले जाते की वादीच्या प्रतिनिधीला तोंडी कळविण्यात आले होते की 36,00,00,000/- रुपयांच्या मुदत ठेवी प्रतिवादी - बँकेने

मुदतपूर्व काढण्यास परवानगी दिली आहे. जेव्हा वादीने या मुदतपूर्व पैसे काढण्याशी संबंधित कागदपत्रांची विनंती केली, तेव्हा प्रतिवादी - बँकेच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर करण्यास नकार दिला आणि म्हणूनच, वादीने प्रतिवादी - बँकेकडे ठेवलेल्या रु.45,00,00,000/- च्या मुदत ठेव पावत्यां संदर्भात माहितीच्या अधिकारा (आरटीआय) अंतर्गत अर्ज दाखल केला.

14. नायडू यांनी सादर केले की १५ मे २०१९ रोजी, वादीने सह पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली की, प्रतिवादी-बँकेचे तत्कालीन व्यवस्थापक श्री. निखिल रॉय यांनी प्रतिवादी - बँकेत फसवणूक, गैरव्यवहार केला आहे आणि त्यांच्या सक्रिय सहभागाने आणि संगनमताने ३६ ,००,००,०००/- रुपयांची रक्कम वादीच्या संमतीशिवाय आणि बोर्डाच्या कोणत्याही ठरावाशिवाय किंवा कोणत्याही केवायसीशिवाय काढली गेली आहे, जे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे स्पष्टपणे उल्लंघन करणारे होते आणि गुंतवणुकीच्या अनिवार्य पत्रांच्या अटी आणि शर्तींच्या विरोधात होते.

15. नायडू सादर करतात की म्हणून वादीने दिनांक १६ मे २०१९ रोजी प्रतिवादी - बँकेला ४५,००,००,०००/- रुपयांच्या सात मुदत बंद ठेव पावत्या मधील रक्कम मुदतपूर्व काढण्यासाठी पत्र सादर केले.

16. त्यानुसार, प्रतिवादी - बँकेने १६ मे २०१९ रोजी च्या पत्राद्वारे वादीला कळवले की ते या पत्राची तपासणी करीत आहेत आणि ते १७ मे २०१९ च्या अखेरीस त्यास उत्तर देतील. २० मे २०१९ रोजी प्रतिवादी बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे सुद्धा तक्रार करण्यात आली होती.

17. असे सादर करण्यात येते की मात्र, एकाही पत्राला उत्तर देण्यात आले नाही किंवा त्यावर कार्यवाही करण्यात आली नाही.

18. वादीने दिनांक १७ मे २०१९ च्या पत्राद्वारे महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाच्या उपसचिवांना ही माहिती दिली आहे.

19. असे सादर करण्यात आले आहे की वादीने प्रतिवादी - बँकेच्या मुख्य व्यवस्थापकास दिनांक २१ मे २०१९ रोजी वरील तथ्यांसह एक पत्र सादर केले आणि १६ मे २०१९ च्या पत्रानुसार साठलेल्या व्याजासह रक्कम जमा करण्याची विनंती केली.

20. त्यावरून वादीने प्रथम खबरी अहवाल (एफआयआर) तसेच ग्राहक तक्रारही दाखल केली.

21. नायडू सादर करतात की मुदत ठेव पावतींमध्ये वादी आणि प्रतिवादी - बँक यांच्यात मुदत ठेव पावतींमध्ये नमूद केलेली रक्कम व्याजासह अदा करण्याचा अलिखित

करार असतो. तो म्हणजे, प्रतिवादी बँकेच्या बाजूने रक्कम रुपये ४५,००,००,०००/- चे व्याजासहित दायित्व हे स्वीकृत दायित्व आहे.

22. त्यानंतर, २४ ऑगस्ट २०२० रोजी, वादीने प्रतिवादीला - बँकेला इतर गोष्टींसह कायदेशीर नोटीस पाठवली ज्यात मुदत बंद ठेव रक्कम व्याजासह अदा करावी असे सांगण्यात आले, जी दिनांक १ सप्टेंबर २०२० रोजी हाती प्रतिवादीला देण्यात आली. सदर नोटिशीला प्रतिवादी बँकेतर्फे दिनांक ३० सप्टेंबर २०२० रोजी उत्तर देण्यात आले.

23. हे सादर केले जाते की प्रतिवादी - बँकेने खोट्या, क्षुल्लक आणि खोडसाळ कारणास्तव फसवणूक करून ही रक्कम देण्यास नकार दिला आहे.

24. त्यानंतर, दिनांक 28 डिसेंबर 2020 रोजी च्या रिजॉइंडर नोटीस द्वारे , वादीने प्रतिवादी - बँकेने नोटीस उत्तर मध्ये वादी विरुद्ध उपस्थित केलेले बचाव फेटाळून लावले.

25. वादीचे विद्वान वकील श्री. नायडू सादर करतात की प्रतिवादी - बँकेने २ सप्टेंबर २०२१ रोजी वादीला रु. ९,००,००,००० /- ची मुदत बंद ठेव व्याजासह दिली आहे आणि त्यामुळे, प्रतिवादी - बँक ३६,००,००,०००/- रुपयांच्या मुदत ठेवी व त्यावरील व्याज

परत देण्यात अपयशी ठरली आहे. हा प्रतिवादी - बँकेने उपस्थित केलेला युक्तिवाद व बचाव खोटा, बोगस आणि असंभवनीय आहे.

26. नायडू यांनी सादर केले की फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १०२ अन्वये अधिकारांचा वापर करून गुजरातमधील अखंड आनंद सहकारी बँकेत दीपक दयाभाई शहा यांच्या नावाने आरोपीने उघडलेल्या बँक खाते क्रमांक १००२२०१०१०५९० मध्ये ११,३९,६२,५३१/- रुपयांची रक्कम गोठविण्यात आली आहे. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लेनेड, मुंबई यांच्या ४७ व्या न्यायालयात यासंदर्भात फौजदारी तक्रारही दाखल करण्यात आली असून हे प्रकरण प्रलंबित आहे, असे नायडू यांनी सांगितले. त्यामुळे दाव्याच्या तपशीलानुसार मुदत ठेव पावतींच्या आधारे मुदत ठेवी वर मिळणाऱ्या व्याजासह एकूण रु.३६,००,००,०००/- साठी हा दावा दाखल करण्यात आला आहे.

27. नायडू यांचे म्हणणे आहे की वादी - मंडळा द्वारे प्रतिवादी - बँके कडे मुदत ठेवी ठेवणे हा व्यवहार एक व्यावसायिक व्यवहार आहे आणि मुदत बंद ठेव पावती जी बँक आणि व्यापारी यांच्यातील कागदपत्र आहे त्यासंदर्भात पैसे परत मागणे हा एक सामान्य व्यवहार आहे. श्री. नायडू व्यावसायिक न्यायालय कायद्याच्या कलम २ (१) (सी) (i) मधील व्यावसायिक वादाच्या व्याख्येकडे या न्यायालयाचे लक्ष वेधतात आणि सादर

करतात की या व्यापाराच्या संदर्भित दस्तऐवजांची अंमलबजावणी आणि विवेचन देखील एक व्यावसायिक वाद ठरेल. व्यावसायिक न्यायालय कायद्याच्या कलम दोन मधील स्पष्टीकरणाचा संदर्भ देत विद्वान वकिलांनी सादर केले की, व्यावसायिक वाद केवळ करार केलेल्या पक्षांपैकी एक पक्ष शासन किंवा त्याची कोणतीही एजन्सी किंवा सार्वजनिक कार्ये करणारी खाजगी संस्था आहे म्हणून व्यावसायिक वाद हा व्यावसायिक वाद बनणार नाही.

28. बँकिंग नियमन कायदा, १९४९ चा संदर्भ देत नायडू सादर करतात की कलम ५ (ब) हे "बँकिंग" ची व्याख्या करते ज्याचा अर्थ स्वीकारणे, कर्ज देण्याच्या किंवा गुंतवणुकीच्या हेतूने, लोकांकडून पैसे जमा करणे, मागणीनुसार किंवा इतर प्रकारे परतफेड करणे; म्हणूनच, वादी - मंडळाने प्रतिवादीकडे मुदत ठेवी ठेवणे हा बँकिंग व्यवहार आहे. बँकर आणि ग्राहक यांचे नाते धनको आणि ऋणको असे असते आणि बँकेत जमा केलेले पैसे त्यांना विश्वासावर दिले आहेत असे मानता येणार नाही तर ती त्यांना ठराविक कालावधीसाठी अटींवर व्याजासहित परतफेड करण्यासाठी दिलेली रक्कम आहे, असे नायडू यांचे म्हणणे आहे. त्या, वादी - मंडळाने प्रतिवादी -बँकेकडे मुदत ठेवी ठेवल्यास वादी आणि प्रतिवादी यांच्यातील संबंध धनको आणि ऋणको म्हणून बनवते कारण बँकेकडे ठेवलेली रक्कम बँकेने मुदत ठेव पावतीच्या अटींनुसार व्याजासह परत करायची असते. त्यामुळे हा वाद व्यापारी दस्तऐवज असलेल्या मुदत ठेवपावतींच्या अंमलबजावणीशी संबंधित बँकेच्या सामान्य व्यवहारातून निर्माण झालेला

व्यावसायिक वाद आहे. त्यामुळे हा वाद व्यावसायिक वाद असू शकत नाही किंवा हा दावा व्यावसायिक समरी दावा नाही, असा युक्तिवाद नायडू यांनी केला आहे. आयएचएचआर हॉस्पिटॅलिटी (आंध्र) प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध सीमा स्वामी आणि इतर (सुप्रा) प्रकरणात प्रतिवादी - बँकेच्या विद्वान वकिलाने विश्वास ठेवला होता, हा दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय स्पष्टपणे वेगळा आहे कारण हा खटला एक कंपनी आणि आरोपीची पत्नी यांच्यात होता, ज्याने धनादेशाद्वारे मोठ्या रकमेचा अपहार केला होता आणि वादी कंपनीच्या बँक खात्यातून थेट फसवणुकीचा व्यवहार करून पैसे काढले होते. त्यामुळे हा दावा बनावट धनादेश आणि खात्यांच्या खोट्या माहितीच्या आधारे फसवणुकीवर आधारित असल्याचे ठरविण्यात आले होते, जे येथे तसे नाही, कारण बँकेच्या कर्मचाऱ्यासह इतर सहकाऱ्यांनी निधीचा अपहार केला असला तरी सध्याचा दावा हा वादी - मंडळाने प्रतिवादी - बँकेचा ३६,००,००,०००/- रुपयांच्या मुदत ठेवींच्या व्याजासह वसुलीसाठी केलेला दावा आहे, आणि फसवणूक किंवा गैरव्यवहारात सामील कर्मचारी किंवा व्यक्तीं विरूद्ध नाही आणि म्हणूनच, वरील निर्णय स्पष्टपणे वेगळा आहे आणि प्रकरणाच्या तथ्यास लागू होत नाही.

29. श्री नायडू त्यामुळे सादर करतात की सीपीसी च्या आदेश ७ नियम ११ प्रमाणे करण्यात आलेला अर्ज फेटाळण्यात यावा.

30. मी विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले आहे आणि प्रतिस्पर्धी युक्तिवादांचा विचार केला आहे.

31. व्यावसायिक वादाची व्याख्या करणारे व्यावसायिक न्यायालय कायद्याचे कलम २ (१) (क) खालीलप्रमाणे उद्धृत केले आहे :

> "2. (1) (C) "व्यावसायिक वाद" म्हणजे त्यातून उद्भवलेला वाद-
> (i) व्यापारी, बँकर्स, फायनान्सर आणि व्यापारी यांचे सामान्य व्यवहार जसे की व्यापारी दस्ताऐवजांशी संबंधित, ज्यामध्ये अशा दस्तऐवजांची अंमलबजावणी आणि व्याख्या समाविष्ट आहे;
> (ii) माल किंवा सेवांची निर्यात किंवा आयात;
> (iii) ॲडमिरल्टी आणि सागरी कायद्याशी संबंधित मुद्दे;
> (iv) विमाने, विमानांची इंजिने, विमानांची उपकरणे आणि हेलिकॉप्टर यांच्याशी संबंधित त्यांची विक्री, भाडेपट्टी आणि वित्त पुरवठा यासह;
> (v) मालाची वाहतूक;
> (vi) बांधकाम आणि पायाभूत सुविधांचे करार, निविदासह;
> (vii) केवळ व्यापार किंवा व्यापारात वापरल्या जाणाऱ्या स्थावर मालमत्तेशी संबंधित करार;
> (viii) फ्रँचायझिंग करार;
> (ix) वितरण आणि परवाना करार;
> (x) व्यवस्थापन आणि सल्लागार करार;
> (xi) संयुक्त उपक्रम करार;
> (xii) भागधारकांचे करार;
> (xiii) आऊटसोर्सिंग सेवा आणि वित्तीय सेवांसह सेवा उद्योगाशी संबंधित सदस्यता आणि गुंतवणूक करार;
> (xiv) व्यापारी एजन्सी आणि व्यापारी वापर;
> (xv) भागीदारी करार;
> (xvi) तंत्रज्ञान विकास करार;

(xvii) नोंदणीकृत आणि नोंदणीकृत नसलेले ट्रेडमार्क, कॉपीराइट, पेटंट, डिझाइन डोमेन नाव, भौगोलिक संकेत आणि सेमीकंडक्टर इंटिग्रेटेड सर्किटशी संबंधित बौद्धिक संपदा हक्क;

(xviii) वस्तूच्या विक्रीसाठी किंवा सेवेच्या तरतुदीसाठी करार;

(xix) तेल आणि वायूचे साठे किंवा इलेक्ट्रोमॅग्नेटिक स्पेक्ट्रमसह इतर नैसर्गिक संसाधनांचे शोषण;

(xx) विमा आणि पुनर्विमा;

(xxi) वरीलपैकी कोणत्याही संबंधित एजन्सीचे करार; आणि

(xxii) केंद्र सरकार द्वारे अधिसूचित केले जातील असे इतर व्यवसायिक विवाद.

स्पष्टीकरण:- व्यावसायिक वाद हा केवळ व्यावसायिक वाद म्हणून थांबणार नाही कारण-

(a) यात स्थावर मालमत्तेची पुनर्प्राप्ती किंवा गहाण म्हणून दिलेल्या स्थावर मालमत्तेमधून पैसे वसूल करण्यासाठी किंवा स्थावर मालमत्तेशी संबंधित इतर कोणत्याही सवलतीचा समावेश आहे;

(b) करार करणाऱ्या पक्षांपैकी एक म्हणजे राज्य किंवा त्यांची कोणतीही एजन्सी किंवा यंत्रणा, किंवा सार्वजनिक कार्ये करणारी खाजगी संस्था;

(जोर दिला आहे)

32. बँकिंग नियमन कायदा, १९४९ च्या कलम ५ (ब) मध्ये बँकिंगची व्याख्या खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

"5. व्याख्या - या अधिनियमात, विषय किंवा संदर्भात काही ही विसंगत नसल्यास,

(अ) ....

(ब) "बँकिंग" म्हणजे कर्ज देण्याच्या किंवा गुंतवणुकीच्या हेतूने, जनतेकडून पैसे जमा करणे, मागणीनुसार किंवा इतर प्रकारे परतफेड करणे आणि चेक, ड्राफ्ट, ऑर्डर किंवा इतर मार्गाने काढणे होय;

...........”

(भर देण्यात आला)

33. यात वाद नाही की वादी - मंडळाने प्रतिवादी - बॅंकेकडे ४५,००,००,०००/- रुपयांच्या मुदत ठेवी ठेवल्या, दाव्यात जोडल्याप्रमाणे त्या मुदत ठेव पावत्यांमध्ये नमूद केलेल्या अटींवर ठेवल्या. मुदत ठेव पावती ही निश्चित मुदतीसाठी ठेव पावती आहे. ज्याचा अर्थ मुदत ठेव पावतींमध्ये नमूद केलेली रक्कम मुदतपूर्तीवर व्याजासह देण्याचे वचन आहे. रु.४५,००,००,०००/- च्या मुदत ठेवींपैकी वादी - मंडळाला रु.९,००,००,०००/- च्या मुदत ठेवी २ सप्टेंबर २०२१ रोजी व्याजासह अदा करण्यात आल्या आहेत याबद्दलही वाद नाही. त्यामुळे रु.३६,००,००,०००/- च्या मुदत ठेवी व्याजासह भरणे बाकी आहे. ३६,००,००,०००/- रुपयांच्या मुदत ठेवी फसवणुकीने, मुदतपूर्व काढल्या आणि अपहार केल्याचा आरोप आहे. ते, त्यातील काही भाग म्हणजे रु.11,39,62,531/- जो हडप करून गुजरातमधील अखंड आनंद को-ऑपरेटिव्ह बँक जमा करण्यात आला तो डेबिट फ्रीझ करण्यात आला आहे. प्रतिवादी- बँकेच्या व्यवस्थापकाने फसवणूक आणि गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे ज्यामुळे मुदतपूर्व पैसे काढण्याची / बंद करण्याची प्रक्रिया झाली आहे. त्यासंदर्भात फौजदारी कार्यवाही देखील प्रलंबित आहे. दाव्याचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, वादी - मंडळाने सदर रकमेच्या वसुलीसाठी प्रार्थना कलम ५८ (अ), (ब) व (क) मध्ये व्याजासह व पुढील व्याजासाठी प्रार्थना कलम (ड) मध्ये रु.३६,००,००,०००/- चा दावा केला आहे.

बँकिंगचा व्यवसाय करणाऱ्या प्रतिवादी - बँकेकडे वादी - मंडळांनी मुदत ठेवी ठेवल्या होत्या यात वाद नाही. असे दिसून येते की, प्रतिवादी - बँक, जी बँकिंग कंपनी / बँकर आहे, आपल्या व्यवसायाच्या सामान्य कालावधीत, वादी - मंडळाकडून पैशाच्या ठेवी स्वीकारल्या आहेत ज्या मागणी किंवा परिपक्वतेवर परतफेड केल्या जातात आणि मुदत ठेव पावत्या जारी केल्या आहेत ज्या व्यापारी दस्तऐवज आहेत आणि मुदत ठेव पावत्यांच्या अंमलबजावणीसाठी दावा दाखल केला गेला आहे, प्रतिवादी - बँकेस वसुलीसाठी मागणी / कायदेशीर नोटीस देऊनही वादी - मंडळाला देय रक्कम परत करण्यात अपयशी ठरली होती, म्हणून, माझ्या मते, हा वाद एक व्यावसायिक वाद आहे, जो व्यावसायिक न्यायालय कायद्याच्या कलम 2 (1) (सी) (i) अंतर्गत परिभाषित व्यावसायिक वादाच्या व्याख्येत येतो. प्रतिवादी - बँक चा मॅनेजर किंवा इतर सह-सूत्रधार यांचे विरुद्ध प्रतिवादी- बँकेवर केलेल्या फसवणुकीबद्दल फौजदारी कारवाई प्रलंबित आहे, तेथे निधीचा कथित अपहार / लुबाडणे झाले आहे, माझ्या मते, वादाचे स्वरूप किंवा रूप बदलून, तो व्यावसायिक होणार नाही. दाव्यात अफरातफर, फसवणूक, गैरव्यवहार यांचा उल्लेख केल्यास दावा कारण बदलणार नाही, जे दाव्याच्या परिच्छेद ५२ मध्ये नमूद केले आहे, ज्यात असे म्हटले आहे :

> "52) कारवाईचे कारण :- सध्याचा दावा दाखल करण्याच्या कारवाईचे कारण प्रथम १३/५/२०१९ रोजी उद्भवले जेव्हा वादीला प्रथम वादीच्या रु.३६.०० कोटी रुपयांच्या मुदत ठेवीबद्दल झालेल्या फसवणुकीची माहिती मिळाली आणि त्यानंतर जेव्हा वादीने ते पत्र / नोटीस प्रतिवादीला सादर केली

तेव्हा आणि त्यानंतर जेव्हा प्रतिवादीने मुदत बंद ठेव पावती नुसार त्यावरील व्याजासह 36 कोटी रुपयांची उपरोक्त रक्कम भरली नाही तेव्हा. त्यानंतर जेव्हा वादीने प्रतिवादीला कायदेशीर नोटीस पाठविली ज्यावर प्रतिवादीने आजपर्यंत कारवाई केली नाही आणि ती रक्कम वादीला अदा केली नाही. वादीने प्री इन्स्टिट्यूशन मेडिएशन व्यावसायिक वाद क्रमांक ४६/२०२० हे मध्यस्थी प्रक्रियेसाठी दाखल केले होते ज्यात प्रतिवादीने प्रतिवादीने मध्यस्थी प्राधिकरणासमोर दिनांक २५/११/२०२० रोजी सादर केलेल्या पत्रानुसार या मध्यस्थी प्रक्रियेत भाग घेण्यास नकार दिला होता. त्यामुळे उपनिबंधक (मध्यस्थी) यांनी आपल्या दिनांक २५/११/२०२० रोजीच्या पत्राद्वारे या प्रकरणात नॉन स्टार्टर रिपोर्ट जारी केला. त्यानंतर डिसेंबर २०२०, जानेवारी आणि फेब्रुवारी २०२१ महिन्यात सर्व मुदत बंद ठेव पावत्यांची मुदत संपली. तथापि, दाव्याच्या तपशिलात नमूद केलेल्या मुदत बंद ठेव पावती नुसार 36.00 कोटी रुपयांच्या मुदत बंद ठेव पावतीची रक्कम व्याजासह भरण्यात प्रतिवादी अपयशी ठरली. दिनांक १८/१२/२०१८ रोजीची मुदत बंद ठेव पावती क्र.३८१३४५००५९०, ३८१३४४७७६८३ आणि दिनांक १९/०१/२०१९ रोजी ची मुदत बंद ठेव पावती क्रमांक क्र.३८१९९११७५७९९ आणि दिनांक १६/०२/२०१९ रोजीची मुदत बंद ठेव पावती क्रमांक ३८२६४४३५६३३ या सर्व मिळून एकूण रु.36 कोटी भरण्यात अपयशी ठरली. त्यामुळे वादीला या माननीय न्यायालयात सध्याचा समरी दावा दाखल करणे भाग पडले आहे. मुंबई उच्च न्यायालयातील उपनिबंधक (मध्यस्थी) यांनी दिनांक २५/११/२०२० रोजी जारी केलेल्या पत्राची सही साक्षांकित प्रत सोबत जोडले आहे त्याला निशाणी "एफ एफ" देण्यात आली आहे. यासोबत वादीच्या दाव्याच्या तपशिलाची सही साक्षांकित प्रत सोबत जोडली आहे त्याला निशाणी "जीजी" देण्यात आली आहे.

34. हे अगदी स्पष्ट आहे की मुदत बंद ठेव पावती ची रक्कम रुपये ३६,००,००,०००/- ही प्रतिवादी बँक व्याजासहित परत देऊ शकली नाही त्यामुळे कार्यवाहीचे कारण झाले आहे, कायदेशीर नोटीस बजावून तसेच प्री इन्स्टिट्यूशन मध्यस्थी, जी अपयशी ठरली,

कारण प्रतिवादी-बँक यांनी मध्यस्थी प्रक्रियेत सहभाग घेण्यास नकार दिला. वरील परिच्छेद स्पष्टपणे मुदत ठेव पावतींचा क्रमांक आणि रक्कमे सह संदर्भ देतो ज्यावर व्यावसायिक समरी दावा आधारित आहे. वादी आणि प्रतिवादी - बँक यांच्यातील संबंध धनको आणि ऋणको यांचे आहे आणि कल्पनाशक्तीवर भर न देता, सदरचे संबंध हे व्यावसायिक संबंध नाही असे म्हणता येणार नाही. मी नायडू यांच्याशी सहमत आहे की हा वाद एक व्यावसायिक आहे, जो प्रतिवादी बँक आणि ग्राहक यांच्या सामान्य व्यवहारातून प्रतिवादी बँकेकडे ठेवलेल्या मुदत ठेवीवरील मुद्दल आणि व्याज यांच्या वसुलीवरून उद्भवलेला आहे. मी नायडू यांच्या मताशी सहमत आहे की दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेला आयएचएचआर हॉस्पिटॅलिटी (आंध्र) प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध सीमा स्वामी आणि इतर (सुप्रा) ज्यावर प्रतिवादी बँकेचे विद्वान वकील अवलंबून राहिले या खटल्यात दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय स्पष्टपणे वेगळा आहे कारण त्यातील दावा कंपनी आणि आरोपीची पत्नी यांच्यात होता, ज्याने धनादेशाद्वारे मोठ्या रकमेचा अपहार केला होता आणि वादी-कंपनीच्या बँक खात्यातून फसवे थेट व्यवहार देखील केले आणि पैसे उकळले होते. त्यामुळे हा दावा बनावट धनादेश आणि खोट्या खात्यांच्या आधारे केलेल्या फसवणुकीवर आधारित असल्याचे ठरविण्यात आले होते, जे येथे नाही, कारण बँकेच्या कर्मचाऱ्यासह इतर सहकाऱ्यांनी निधीचा अपहार केला असला तरी सध्याचा दावा हा वादी - मंडळाने प्रतिवादी - बँके वर ३६,००,००,०००/- रुपयांच्या मुदत ठेवींच्या व्याजासह वसुलीसाठी केलेला दावा आहे, आणि फसवणुकीत

किंवा गैरव्यवहारात सामील कर्मचारी किंवा व्यक्तीं विरूद्ध नाही आणि म्हणूनच , प्रतिवादी - बँकेने या निर्णयावर अवलंबून राहणे चुकीचे आहे.

35. त्यानुसार व्यावसायिक न्यायालय कायद्याच्या कलम २ (१) (सी) (i) अन्वये परिभाषित केल्याप्रमाणे हा वाद व्यावसायिक वाद आहे, असे माझे मत आहे. दाव्याचे मूल्य रु.36,00,00,000/- पेक्षा जास्त आहे, जो निर्दिष्ट मूल्यापेक्षा जास्त आहे आणि म्हणूनच, व्यावसायिक समरी दावा म्हणून व्यावसायिक श्रेणीत योग्यरित्या नोंदणीकृत आहे.

36. त्यामुळे हा दावा व्यावसायिक न्यायालय कायद्याने प्रतिबंधित नसल्याने मी हा अर्ज फेटाळून लावत आहे.

37. सीपीसीच्या आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल करण्यात आलेला अंतरिम अर्ज, त्यानुसार बरखास्त करण्यात येत आहे. त्यामुळे प्लेंट नाकारण्याचा / परत करण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही.

(न्यायमूर्ती अभय आहूजा.)

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x